بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصاراللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# आदरणीय सय्यदाः अम्तुल कुद्दूस साहिबा पत्नी साहिबज़ादा मिर्ज़ा वसीम अहमद साहेब यांचा प्रसंगविशेष वर्णन

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरुर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. १५-९-२०२३ स्थान मशिद मुबारक टिलफर्ड, लंडन

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहानंतर हुजूर अनवर म्हणालेः सर्वशक्तिमान अल्लाहचा नियम आहे की जो कोणी या जगात येतो तो एक निर्धारित वेळ लावून हे जग सोडून जातो; परंतु भाग्यवान ते आहेत ज्यांची फक्त चांगल्या आठवणी आहेत, जे लोकांसाठी फायदेशीर असतात आणि जे ऐहिक जीवनावर धर्माला प्राधान्य देणारे आदर्श उदाहरण बनतात आणि जे अल्लाह आणि पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आदेशानुरुप जीवन व्यतित करतात आणि हजरत अपेक्षित मसीह यांची दीक्षा स्वीकारल्यानंतर त्यानुसार जीवन जगतात आणि जे खीलाफत ए अहमदियाचे सच्चे व एकनिष्ठ विश्वासू असतात, जे लोकांची सेवा ईश्वरीय आदेशानुसार करत असतात आणि त्याची मर्जी संपादन करण्याकडे नेहमी प्रयत्नशील राहतात. आणि अशा व्यक्तिंसाठी सर्वांच्या मूखातून स्तूतीचे शब्दच बाहेर पडतात आणि पवित्र पैगंबर (स.) यांच्या शब्दानुसार त्यांना हमखास स्वर्ग प्राप्ती होते.

यावेळी, मी अशाच एका व्यक्तिमत्वाचा उल्लेख करणार आहे, ते आहेत श्री. अमतुल कुद्दूस साहिबा, जे हजरत डॉ. मीर मुहम्मद इस्माईल साहिब यांची कन्या आणि साहिबजादा मिर्झा वसीम अहमद साहिब यांच्या पत्नी होत्या. हजरत मुस्लेह माऊदची सून होती. तसे त्या कादियानचे रहिवासी होत्या, पण नुकतेच रबवाहमध्ये त्यांच्या मुलींना भेटायला आल्या होत्या, जिथे वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. اناللہوانااليہراجعون अल्लाहच्या कृपेने १/९ भाग देऊन त्यांनी वसीयत केली होती.

१९५१ च्या वार्षिक सम्मेलनाच्या प्रसंगी, हजरत मुस्लेह माऊद यांनी साहिबजादा मिर्झा वसीम अहमद साहिब यांच्याशी त्यांचा विवाह केला. सासरवाडी जात असताना, हजरत मुसलेह माऊद (र.ज.) त्यांच्या मुलाऐवजी मुलीच्या बारातमध्ये सामील झाले होते.

अल्लाहने त्याना तीन मुली आणि एक मुलगा दिले आहे. एक मुलगी, अम्तुल-अलीम साहिबा, सध्या पाकिस्तान लज्नाची (महिला संघटन) अध्यक्ष आहेत, त्या तहरीक-ए-जादीदचे वकील मा. मन्सूर अहमद खान साहिब यांची पत्नी आहेत. दुसरी मुलगी अम्तुल करीम साहिबा ही कॅप्टन माजिद साहिब यांची पत्नी आहेत. तिसरी मुलगी, अम्तुल-रौफ साहिबा ही डॉ. इब्राहिम मुनीब यांची पत्नी आहे. मिर्झा कलीम अहमद हा त्यांचा मुलगा अमेरिकेत राहतात.

साहिबजादा मिर्झा वसीम अहमद साहिब त्यांच्या लग्नाच्या वेळी पाकिस्तानात आले होते आणि त्यांच्या लग्नाला काही दिवस लोटल्यावर ते आपल्या पत्नीला कादियानला घेऊन जाण्यासाठी कागदपत्रे

तयार करत होते. जसे की पाकिस्तान आणि भारतामध्ये संबंध वर-खाली होत राहतात तसेच त्यावेळी देखील तणाव निर्माण झालं होतं, तेव्हा हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांनी त्यांना सांगितले की, त्यांच्या पत्नीचे कागदपत्र बनत राहतील, आता तिला सोडून एकटेच ताबडतोब कादियानला जावा, कारण अपेक्षित मसीहाच्या कुटूंबातला एक तरी व्यक्ति तिथे असणे गरजेचे आहे.

ते म्हणाले, विमानात ताबडतोब सीट बुक करा आणि विमान उपलब्ध नसेल तर चार्टर्ड विमान करून जा. पुढे म्हणाले, ''जर तुम्ही तुमचा आदर्श दाखवला नाही आणि त्याग केला नाही तर लोक त्याग कसे काय करतील?

हा बलिदान साहिबजादा मिर्झा वसीम अहमद साहिब यांचाच नव्हे तर अम्तुल कुद्दूस साहिबा यांचाही बलिदान होता. कागदपत्रे कधी पूर्ण होतील हे माहीत नव्हते, परिस्थिती तणावपूर्ण होती, हे सर्व असूनही खलिफाचा आदेश होता, त्यामुळे त्यांनी विश्वासाने आपल्या पतीला निरोप देऊन धर्माला ऐहिक व्यवहारावर प्राधान्य दिला.

अम्तुल कुद्दूस साहिबा यांचे कागदपत्रे पूर्ण व्हायला सुमारे एक वर्ष लागले आणि जेव्हा ती कादियानला जायला लागली तेव्हा ती सांगते की हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) यांनी मला उम्मे नासीरच्या घरात राहण्याची सूचना केली जिथे हजरत अपेक्षित मसीह यांचे पाय पडलेले आहेत. आणि तिथल्या आंगणात हुजूर ने प्रवचन देखील दिले आहेत.

हजरत मुस्लेह माऊद यांनीही त्यांना सल्ला दिला की लज्नाच्या जमाअतांना एकत्र करण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे साहिबजादी अमतुल कुद्दूस साहिबा यांनी कादियानमध्ये जाऊन जमाअतच्या महिलांना एकत्र करण्यात आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

हजरत अपेक्षित मसीहाचे चौथे खलीफा (र.ज.) यांनी लंडनमध्ये आल्यानंतर त्यांच्या पहिल्या शुक्रवारच्या प्रवचनात, युरोपमध्ये इस्लामच्या प्रचारासाठी दोन केंद्रे स्थापन करण्यासाठी आर्थिक त्यागाच्या चळवळीची घोषणा केली; त्यावेळी अमतुल कुद्दूस साहिबा हे लज्ना भारतचे प्रमुख पदावर आरूढ होत्या, त्यांच्या पदावर असताना महिलांनी अनन्यसाधारण अनुदानाचा कार्य बजावले. त्यांनी स्वतः आपले सर्व दागिने अनुदानात अर्पण केले.

हजरत अपेक्षित मसीहाचे चौथे खलीफा (र.ज.) जेव्हा कादियानला गेले तेव्हा त्या प्रसंगी त्यांनी कादियानच्या आर्थिक बलिदानाचा उल्लेख अतिशय मोहक पद्धतीने केला. ते म्हणाले की सर्वशक्तिमान अल्लाहच्या कृपेने, मी भारतातील सर्व लजनाबद्दल तर ठामपणे सांगू शकत नाही, परंतु कादियानच्या लजनाबद्दल मी असे म्हणू शकतो की ते आर्थिक त्यागातील अतुलनीय उदाहरणे दाखवणारे महिला आहेत.

हजरत मुस्लेह माऊद (र.ज.) ने जेव्हा अमतुल कुद्दूस साहिबा यांना कादियानला पाठवले तेव्हा त्याना लज्नाला एकत्र आणण्याचा आणि त्यांना भक्कम करण्याचा सल्ला दिला. कादियान मध्ये आल्यावर ती प्रथम कादियानची सरचिटणीस बनली, त्यानंतर १९५५ मध्ये पहिले स्थानिक लज्ना आणि नंतर लज्ना भारताचे अध्यक्षपदासाठी त्यांची निवड झाली. त्यांनी ही सेवा सुमारे ४६ वर्षे निभावली.

अमतुल कुद्दूस साहिबा यांनी पवित्र कुरआनची मोठी सेवा केली. कादियानमधील २५० मुलींना पवित्र कुरआन पठन करणे शिकवले. भारतात एफ.ए वगैरे केलेल्या मुली तीन महिन्यांसाठी कादियानमध्ये यायच्या आणि ते त्यांना कुरआन भाषांतर शिकवायचे. त्यांनी खूप परिश्रम करून महिलांना संघटित केले. आदरातिथ्य हा त्यांचा एक विलक्षण गुण होता. त्यांची मुलगी सांगते की त्यांनी आमच्या वडिलांचा खूप साथ दिला. परिस्थिती अत्यंत गरीब होती, दुपारी फक्त मुग डाळ असायची, वडिलांनी दूध-दह्यासाठी म्हैस ठेवली होती. जर एखादा पाहुणा आला असता तर जो काही घरात उपलब्ध असायचा ते त्यांच्या सेवेत पाठवत असे.

त्या एक चांगली पत्नी होत्या, कठीण परिस्थितीत उभी होत्या. कधीही कोणतीही मागणी केली नाही. जे मिळेल ते आनंदाने खर्च करायचे. त्या एक व्यवस्थित आणि सभ्य स्त्री होत्या. वयाच्या अखेर क्षणात सुध्दा, जेव्हा त्यांची दृष्टी गेली आणि ऐकू येत नव्हते, तेव्हाही त्यांनी खूप आनंदी जीवन जगले. जेव्हा जेव्हा त्यांच्या स्थितीबद्दल विचारले जायचे तेव्हा ते नेहमी अलहमदुलिल्लाह (सर्व स्तूतीचा स्वामी अल्लाहच आहे) म्हणायची. खलिफाकडून जर एखादी मागणी झाली तर कादियानमधून सर्वप्रथम देणगी देणारे मिर्झा वसीम अहमद साहब आणि त्यांच्या पत्नी होते. त्यांची मुलगी म्हणते की जर आम्ही पवित्र कुरआनचे पठण करण्यात काही चूक केली आणि आमची आई दुसऱ्या खोलीत असेल, तर ती तिथून आम्हाला सुधारायचे आम्हाला असे वाटत होते की जणू त्यांनी पूर्ण कुरआन तोंडपाठ केलं आहे की काय.

आजारी असूनही नेहमी लोकांच्या सुख-दुःखात सामील व्हायचे. कादियानच्या मुलींना शिवणकाम शिकवायचे. कादियानमध्ये सर्वांशी मिळून मिसळून राहण्याची संस्कृती त्यांनी निर्माण केली होती.

भारताच्या फाळणीनंतर, रतन बाग लाहोर आणि नंतर रबवाहच्या तत्कालीन झोपड्यांमध्ये हजरत अम्मान जान (र.जि.) समोर पवित्र कुरआन आणि मल्फूज़ात पठन करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी हिस्सा जायदाद आणि वसीयत त्यांच्या हयातीतच पूर्ण अदा केला तसेच तहरीक ए जदीद दफ्तर अव्वल मध्ये देखील त्यांचा समावेश होता. नमाज प्रथम समयात अदा करण्याची ताकीद ते त्यांच्या मुलांना करत होत्या.

त्यांनी अनेक मुलींचे संगोपन केले. त्यांचे चांगल्याप्रकारे प्रबोधन केले आणि तद्नंतर त्यांचे लग्न करून दिले. दर्विशीच्या काळात आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असताना एखाद्या दरवेशच्या मुलीचे लग्न झाले तर ते तिला त्यांचे दागिने घालायला द्यायचे, जोपर्यंत तिची मनाची इच्छा असेल, त्यानंतर दुसऱ्या मुलीचे लग्न झाले तर ते दागिने तिला द्यायचे.

लोक आपले अनामत त्यांच्याकडे ठेवायचे आणि ते सर्व अनामत त्यांनी प्रामाणिकपणे सांभाळले. त्यांनी अनेक मुलींना शिष्टाचार शिकवले, त्यांच्यासाठी हुंडा तयार केला, दर्विशांच्या विधवांना ईदच्या भेटवस्तू देण्यासाठी ते स्वतः जात असत.

त्यांच्या मुलांचे म्हणणे आहे की बहुतेक पाहुणे दारुल मसीह येथे राहायचे आणि आमची आई स्वतः अकरा आणि बारा वर्षांच्या मुलांना खोलीतील पाहुण्यांच्या गरजा कशा सांभाळायच्या याचे प्रशिक्षण देत असे. सरकारी अधिकाऱ्यांच्या पत्नींनाही ती जमाअतची ओळख करून देत असे. वृद्धांची ती खूप काळजी घेत असे.

मिर्झा वसीम अहमद साहिब यांच्या मृत्यूनंतर अमतुल कुद्दूस साहिबा दहा वर्षे कादियानमध्ये राहिल्या. त्यानंतर त्यांची तब्येत खालावली म्हणून त्यांच्या मुलींकडे उपचारासाठी रबवाहला आणले, असे असूनही मी खलिफाच्या परवानगीशिवाय फार काळ कादियानच्या बाहेर राहणार नाही, असे ते म्हणायचे. या संदर्भात त्यांनी मला पत्र लिहिलं, मी उत्तर दिलं की तुम्हाला हवं तितकं दिवस तिथं राहा.

त्यांच्या अंत्ययात्रेला अनेक गैरमुस्लिमही उपस्थित होते. कादियानच्या लोकांनी त्यांच्यावर प्रेम केले आणि त्यांनी देखील कादियानच्या लोकांवर प्रेम केले. कादियानच्या स्त्रियांच्या मोठ्या संख्येत पत्रे आली आहेत ज्यामध्ये त्यांच्या प्रेमभावनेचा उल्लेख केला आहे, त्याचप्रमाणे कादियानच्या जुन्या पुरुष रहिवाशांनीही लिहिले आहे की त्यांनी आम्हाला आईसारखे वाढवले.

खलिफाशी त्यांचे प्रामाणिक संबंध होते. संपूर्ण निष्ठा आणि विनम्रतेचे नाते जसे त्यांनी हजरत मुस्लेह माऊद यांच्याशी कायम ठेवले होते तसाच संबंध माझ्याशी देखील त्यांनी कायम ठेवला. हा खचितच एक अलौकिक उदाहरण आहे. इथेही मला अतिशय सभ्यतेने आणि आदराने भेटले. २००५ मध्ये माझ्या भारत दौऱ्यावेळी त्यांनी पाहुणचार अत्यंत उत्तम रितीने निभावले. प्रत्येक भेटीत ती आनंदी

होती जी त्यांच्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. २००५ मध्ये त्यांची तब्येत बिघडली असतानाही ते कादियानहून दिल्लीला येऊन आम्हाला निरोप दिला. अल्लाह त्यांचे दर्जा उंचावो आणि त्यांच्या अपत्यांना त्यांच्या मार्गानुसार मार्गक्रमण करण्याचे सामर्थ्य देवो. आमीन.

कादियानच्या लोकांना ज्या प्रेमभावनेने त्यांनी जोडून ठेवले होते त्याच भावनेने लोक आजही नांदत राहू हीच अल्लाहसमक्ष प्रार्थना आहे. सध्या कादियानमध्ये हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांच्या घराण्याशी थेट संबंध असलेला कोणीही व्यक्ति नाही. अल्लाह अशी परिस्थिती निर्माण करो की कोणीतरी तिथे जाऊ शकेल.

हुजूर अनवर यांनी मा. मुहम्मद अर्शद अहमदी साहिब, यु.के. आणि मा. अहमद जमाल साहेब ॲफ्रो-अमेरिकन यांच्या देखील नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली. आणि त्यांच्या आध्यात्मिक उत्थानासाठी प्रार्थना केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ. عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔